# कोल्हापूर संस्थानातील छत्रपती शाहू महाराजांचे (१८७४ ते १९२२) आर्थिक धोरण

**डॉ. विद्यासागर पु. सोनकांबळे**
इतिहास विभाग
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन

छ. शाहू महाराजांचे कार्य बहुजन हिताय बहुजन सुखाय अशाच पध्दतीचे होते. ज्याप्रमाणे छ. शिवाजी महाराजांच्या प्रजेला हे राज्य आपले आहे असे वाटत होते त्याच प्रमाणे छ. शाहू महाराजांनी जी कामगिरी केली त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी लोकशाहीच दिसून येते म्हणून छ. शाहू महाराजांच्या प्रजेलाही हे राज्य आपलेच आहे असेच वाटत होते. अपवाद फक्त वर्णवर्चस्ववादी सोडले तर. छ. शाहू महाराज भविष्याचा विचार करून निर्णय घेणारे राजे होते. १८९४ पर्यंत कोल्हापूरची अर्थव्यवस्था विस्कळीत होती, व्यापार फक्त कोल्हापूर संस्थानापुरताच मर्यादीत होता परंतु छ. शाहू महाराजांनी भविष्याचा वेध घेत आर्थिक धोरणाची आखणी केली.

महाराजांना शेतकरी राजा म्हणण्यात भूषण वाटत होते. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लेखसंग्रहामध्ये पुढील उतारा आलेला आहे. "कोल्हापूरच्या शाहू राजांनी मला सांगितले की, राणीपैकी कोणी बाळांतीन झाले की पहील्या रात्री मुलाला वाळलेल्या गवतावर निजवावे अशी चाल महाराजाच्या घराण्यांत होती. या चालीला अर्थही स्वतः महाराजांनी सांगितला की, आम्ही राजे लोक शेतकरी आहोत, हे केव्हाही विसरू नये म्हणुन ही चाल आहे"१या उताऱ्यावरून शाहू महाराजांना शेतक-याविषयी आपूलकी होती असेच दिसते राज्यकारभाराची सुत्रे साभाळल्याबरोबर आपले आर्थिक धोरण स्पष्ट करतांना छ. शाहू महाराज म्हणाले "आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमचे संस्थानची हर एक प्रकारे सदोदीत भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे." २ प्रजेचा सर्वांगीन विकास हाच संस्थानचा विकास याच निती प्रमाणे छ. शाहू महाराजांनी आपले आर्थिक धोरण राबविले. परंपरेने चालत असलेल्या

अर्थव्यवस्थमध्ये बदल करण्यासाठी समाजामध्ये नवजागृती करण्याचे मोठे आव्हान महाराजांपुढे होते. यापुर्वी संस्थानात राजा कोणताही राजपदावर विराजमान व्होवो आपला कर मिळाला का? एवढेचे तो पाहत असे, पंरतु समाज कर देण्यालायक आहे का याचा तो कदापी विचार करीत नसे. एकदंरीत सरकारची धोरणे निरंकुश होती. यावेळी रस्ते, पाणीपुरवठा, दळण-वळणांची साधने, परपंरागत शेती करण्यांची पध्दती, सिमीत उद्योग व व्यापार अशा पध्दतीची मागसलेली अर्थव्यवस्था होती. समाज निरक्षर असल्यामुळे नवे विचार त्यांच्या पर्यंत पोहचत नव्हते. यामुळे त्यांच्या दारिद्रात सतत भर पडीत असे. ही अवस्था बदलण्यासाठी आधुनिकतेची कास धरणे आवश्यक आहे. असे छ. शाहू महाराजांना वाटले म्हणुनच त्यांनी शिक्षण-शेती-उद्योग या सुत्राचा राज्यकारभारात वापर केला.

शेतीचा विकास करावयाचा असेल तर धरण बांधणे आवश्यक होते याच कल्पनेतुन "कोल्हापूरच्या पश्चिमेस सुमारे ३५ मैलावर शेतीला पाणीपुरवठा करण्याची मोठी योजना महाराजांनी १९०७ साली आखली. सन १९०८ साली राधाबाई उर्फ आक्कासाहेब यांचा विवाह देवासच्या महाराजा बरोबर झाला त्यांची आठवण म्हणुन त्यांचे नांवावरून राधानगरी गाव वसविले या राधानगरी धरणासाठी त्यांनी तज्ञ इंजिनिअर्सची मदत घेतली. १९१७ पर्यंत धरणांचे काम पुर्ण झाले होते आर्थिक संकटामुळे काम बंद ठेवावे लागले. शाहू महाराजा नंतर राजाराम महाराजावर हे काम पुर्ण करण्यांचे जबाबदारी पडली कृकृकृ १९५४ साली ते काम पुर्ण झाले... या धरणामुळे २२,००० एकर उसाला पाणी मिळाले" ३ या महान कार्याचे श्रेय छ. शाहू महाराजांना जाते "राधानगरी बरोबरच दुधगंगेवर उगमाच्या दरीला दुसरे धरण बांधण्याची योजनाही त्यांनी आखली होती हाच हल्लीचा काळम्मावाडी प्रकल्प होय."४ शेतीचा विकास करण्यासाठी धरणे बांधण्याचा विचार फार दुरदृष्टीचा होता. पडणाऱ्या पावसाचे व्यवस्थीत नियोजन केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होईल व त्यांचे दारिद्रय संपुष्टात येईल, संस्थानाची भरभराट होईल हाच उद्देश डोळयासमोर ठेवुन महाराजांनी आर्थिक नियोजन केले होते. आपल्या संस्थानाच्या दौऱ्यात शेतक-यांची अवस्था पाहिली होती म्हणुनच महाराजांनी परंपरागत शेती करण्यांची पध्दत व उद्योग बदलण्यासाठी काही बाबीना अग्रकम दिलेला होता. यामध्ये

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

" (१) सार्वजनिक क्षेत्रातील पाणीपुरवठ्यांच्या मोठ्या, मध्यम आणि लहान योजना (२) सरकारच्या कृती विस्तार योजना आणि त्यासंबंधीचे शिक्षण (३) शेतकऱ्यांना बिनव्याजी व सवलतीच्या दराने सरकारी कर्जाचा पुरवठा (४) सहकारी वित्त व्यवस्थेला उत्तेजन आणि (५) जंगल संपत्तीचा पुरेपुर लाभ "५ २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगांव येथील परिषदेच्या भाषणात महाराज म्हणतात " आम्ही शेतकरी किंवा सैनिकच म्हणुनच राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही म्हणुन व्यापार-धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसायात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. हल्ली व्यापार व उद्योग यात आम्ही पडत नाही.

विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती, व्यापार व तत्ससंबंधी चळवळ या वर अवलंबुन आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्राचा धर्म झाला आहे. येथे धर्म म्हणजे बुध्दीयुक्त स्वहित साधणे असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाहीतर आमच्या चळवळी निस्तेच व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पुर्ण विश्वास असल्यामुळे मी माझ्या दोघा मुलांना व दुसऱ्या जवळच्या आप्तांना व्यापारात घातले आहे. आणि मला सांगण्यास समाधान वाटते की, त्यांनी तो धंदा मोठ्या आनंदाने स्वीकारला आहे"६ महाराजांनी पाश्चिमात्य देशात जेव्हाही दौरा केला त्या-त्या वेळी तेथील आर्थिक जीवनाची पाहणी केलेली होती. पाश्चिमात्य देशात औद्योगीक क्रांतीमुळे फार मोठा आर्थिक बदल झालेला होता. अशा देशानी मागासलेल्या देशात आपला व्यापार वाढविलेला होता यामुळे ही राष्ट्र सधन झालेली होती. परंतु भारतातील शेती व्यवसायास आधुनिक पध्दतीची जोड न मिळाल्यामुळे येथील शेती अप्रगतच होती. म्हणुनच महाराजानी वैज्ञानिक शेती व्यवसायाबरोबर व्यापार करण्यावरही भर दिलेला होता आणि याची सुरवात स्वतःच्या घरातुनच केलेली होती. शाहु महाराजानी शेती, व्यापार या बरोबरच उद्योग धंद्यालाही प्रोत्साहन दिले होते.

"उद्योग धंद्याची वाढ होण्याच्या दृष्टीने महाराजानी एक नविन नगर वसविण्याचे ठरविले. तेथे जाऊन व्यापार करण्यासाठी व्यापाऱ्यांना त्यांनी सोयी उपलब्ध करून दिल्या. अशा प्रकारे शाहूपुरी, ही नगरी उभारली गेली. त्यामुळे संस्थानातील गुळाचा व्यापार लक्षावधी रूपयांनी वाढला. कोल्हापूरची

व्यापारी जगतात पत नी प्रतिष्ठा त्यांनी वाढवली. "७ उद्योग धंद्यात चालना मिळाल्यामुळे संस्थानातील प्रजेला रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. शेतीमध्ये काम करणारा शेतमजुर हा तुटपुंज्या पैश्यावर काम करीत असे परंतु अशा प्रकारच्या उद्योग धंद्यामुळे त्यांच्या मजुरीमध्ये वाढ होत गेली व त्यांची आर्थिक परिस्थितीही सुधारू लागली. "देशात औद्योगीक वाढीला सहाय्य करण्यांचे धोरण शाहूनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासुनच ठेवले होते. ते कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित नव्हते. पुणे येथील कापडाची गिरणी व रेशमाच्या गिरणीस शाहू छत्रपतीनी भेट दिली." ८

आर्थिक विकासाची घडी आपल्या संस्थानापुरतीच मर्यादित न ठेवता संस्थानाबाहेरही त्याचा प्रचार केला व काही उद्योगांना सहाय्य केले. महाराजानी आपल्या बौध्दीक सामर्थ्याच्या जोरावर आर्थिक धोरणं राबविले होते. यामुळे संस्थानामध्ये आर्थिक विकासाचा दर वाढत होता. महाराजानी ज्या नितीचा अवलंब केलेला होता त्यामध्ये देशप्रेमच दिसुन येते. तसेच महाराजानी स्वदेशी उद्योग-धंद्यास ही प्रोत्साहन दिले. संस्थानामध्ये उद्योग व्यापार वाढावा म्हणुन ते सदैव प्रयत्नशील असत "शाहू छत्रपती शिमल्याहून परत आल्यावर त्यांच्या हस्ते श्री. शाहू स्पिनींग अँड विव्हील मील ची कोणशिला बसविण्याचा समारंभ २७ सप्टेंबर १९०६ रोजी झाला."९ ही गिरणी चालविण्याचा अभ्यास येथील प्रजाजनास नसल्यामुळे ही गिरणी पुढे बंद पडली होती. नंतर दरबाराच्या देखरेखीखाली गिरणी व्यवस्थीत चालु लागली. "महाराजानी यापुर्वीही सुताच्या गिरणीचे उदघाटन केले होते तसेच रायबाग येथे हातमागाचा उद्योग-धंदा एका ब्राम्हणाने सुरू केला होता सदर ब्राम्हण गृहस्थाला छत्रपतीनी भांडवल पुरविले होते."१० महाराजानी यशापयशाचा विचार न करता उद्योग धंदे उभारले होते व हे उद्योग धंदे उभे करीत असता हा उद्योग धंदा कोणत्या जातीचा व्यक्ती सुरू करतो आहे है महाराजानी कधीही पाहिले नाही. हेच वरील उताऱ्यावरून दिसते.

छ. शाहू महाराजानी आपल्या संस्थानामध्ये जी आर्थिक क्रांती केली त्याविषयी डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात "आज कोल्हापूर जिल्हा शेती, सहकार व उद्योग धंदे या क्षेत्रात सर्व महाराष्ट्रात अग्रेसर आहे यांचे श्रेय शाहू महाराजाच्या कल्पक दुरदृष्टीस व लोककल्याणी राज्य

कारभारास जाते. सहयाद्रीत उगम पावणाऱ्या अनेक नदया करवीर राज्यातून वाहतात. त्यापैकी भोगवती नदीवर एक प्रंचड धरण राधानगरी धरण शाहू महाराजानी बांधले आणि कोल्हापूरच्या परिसराचा कायापालट करून टाकला. आपले महाराष्ट्र सरकार हरित क्रांतीच्या योजना आज आखत आहे. स्वांतत्रपुर्व काळात अशा योजना आखुन आपल्या राज्यात पहीली हरित क्रांती घडवून आणणारा हा शेतकऱ्यांचा राजा आजही आदर्शभुत ठरावा. महाराजाच्या प्रयत्नामुळेच पुढे हजारो एकर बागायत शेती तयार होवुन कोल्हापूरचा परिसर उसाच्या मळ्यांनी फुलुन गेला यातुन तयार होणाऱ्या उत्तम प्रतीच्या गुळाने सर्व हिंदुस्थानभर नाव कमविले. " ११ वर्तमान युगात कोल्हापूर जिल्हा हा साखर व गुळाच्या व्यापारात महाराष्ट्र राज्यात प्रगती पथावर आहे. यांचे श्रेय शाहु महाराजाकडेच जाते.

**सारांश**

छ. शाहू महाराज काळाची गती ओळखुन पावले टाकणारे होते. युरोप दौऱ्यावर असतांना तेथील आधुनिक शेती करण्यांची पध्दती, उद्योग धंदे त्यांनी पाहिले होते. संस्थानाचा विकास करावयाचा असेल तर शेती आधुनिक पध्दतीने करावी त्यास उद्योग व व्यापाराची जोड द्यावी. यामुळे सर्व प्रजेला रोजगार मिळेल हीच यामागील त्यांची धारणा होती. महाराजानी राबविलेली आर्थिक धोरणे आणि त्यासाठी अनुसरलेली प्रत्येक्ष मार्ग यामुळे संस्थानाचा आर्थिक विकास स्तर वाढीस लागला. सर्वसमावेशक अर्थशास्त्राचे निर्माते म्हणुन छ. शाहू महाराजाचे स्थान अबाधित आहे. त्यांनी भविष्याचा वेध घेत आर्थिक बाबतीत सुधारणा केल्या या सुधारणा अर्थशास्त्राच्या अभ्यासास अनुसरूनच होत्या.

**संदर्भ:**

१) प्रा. मा. म. देशमुख- सन्मार्ग( दु. आ. १९९२) शिव भारती प्रकाशन नागपूर पृ. ८०

२) राजर्षी शाहू गौरवग्रंथ ( दु. आ. मार्च १९८८) शिक्षण व सेवा विभाग महाराष्ट्र शासन मुंबई पृ. २९

३) श्रीनिवास भालेराव- राजर्षी शाहू महाराज ( दु. आ. २००५) अशोक प्रकाशन पुणे पृ. ३८

४) श्रीनिवास भालेराव- राजर्षी शाहू महाराज. कित्ता पृ. ३९

५) राजर्षी शाहू गौरवग्रंथ - कित्ता पृ. १९१

६) प्रदीप गायकवाड ( संपा) राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे ( दु. आ. २००३) क्षितिज पब्लिकेशन्स नागपूर पृ. २४

७) धनंजय कीर- लोक राजा शाहू महाराज व्यक्तिमत्त्व आणि विचार ( दु. आ. २०००) सुधीर प्रकाशन बोरगाव मेघे जि. वर्धा पृ. ९

८) धनंजय कीर- राजर्षी शाहू छत्रपती ( ति. आ. २००८) पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ. ४९

९) धनंजय कीर- राजर्षी शाहू छत्रपती ( दु. आ. २००२) कित्ता पृ १७

१०) धनंजय कीर- राजर्षी शाहू छत्रपती ( ति. आ. २००८) कित्ता पृ १७५

११) डॉ. जयसिंग पवार- राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा ( प. आ. २००४) सुमारे प्रकाशन डोंबिवली पूर्व पृ. १०